तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई-४००००१.
PH:2264 1150,2 264 1151, 22620601, 22690602, FAX:2692102
Telegram : Edutech E-Mail : director@dte.org.in Website: http://www.dte.org.in

परिपत्रक

क्रमांकः १/डिटीई/२०१०/११८३
दिनांकः- 9 SEP 2010

प्रति,

सहसंचालक तंत्र शिक्षण,
विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,नागपूर,अमरावती,औरंगाबाद.

विषयः- विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत.

आपल्या विभागात येणाऱ्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांमध्ये (तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, व्यवस्थापनशास्त्र) खालील सुविधा तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत संस्थांना कळवावे व त्याचा आढावा आपण वेळोवेळी घेऊन या कार्यालयास सादर करावा.

- ग्रंथालयाची सुविधा सकाळी ८ ते रात्रौ १० या वेळात उपलब्ध करुन द्यावी. परीक्षेच्या कालावधीत वरील सेवा विद्यार्थ्यांना त्यांच्या मागणीनुसार जास्त कालावधीपर्यंत उपलब्ध करुन द्यावेत.
- आपल्या महाविद्यालयातील वसतीगृहात रहाणाऱ्या विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.
- सुट्टीच्या कालावधीत इतर महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी इंडस्ट्रिअल ट्रेनिंगसाठी, आपल्या महाविद्यालयातील वसतीगृहामध्ये रहाण्याची विनंती करीत असतील तर त्यांना शासकीय नियमानुसार सुविधा उपलब्ध करुन द्यावी.
- आपल्या महाविद्यालयामध्ये इंटरनेट, सुसज्ज प्रयोगशाळा विद्यार्थ्यांना त्यांच्या मागणीनुसार कार्यालयीन वेळेनंतर देखील प्राथम्याने उपलब्ध करुन द्याव्यात.

website वर
15/9

शिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
16 SEP 2010
आवक क्र. ६७१८

- आपल्या महाविद्यालयामध्ये टिचिंग लर्निंग प्रोसेसमध्ये केवळ शिक्षकांवर अवलंबून न रहाता काही प्रमाणात माजी विद्यार्थी व उद्योगक्षेत्रातील मान्यवरांचा समावेश करण्यात यावा.
- विद्यार्थी तसेच अध्यापक यांना प्रोत्साहित करण्यासाठी तसेच त्यांनी केलेल्या उल्लेखनिय कामांची नोंद घेण्यासाठी संस्थास्तरावर कार्यवाही करण्यासाठी उचित मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात यावी.
- आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांना त्यांचे प्रोजेक्ट वर्क हे उद्योगधंद्यातील प्रश्न व समाजातील अडचणीवर आधारीत असावे.
- विद्यार्थी, अध्यापक तसेच इतर शिक्षकेतर कर्मचारी यांच्यामध्ये सामाजिक प्रश्नांबददल जागृती, संवेदना निर्माण करण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील काही प्रश्न व त्यावरील उपाययोजना यासाठी संस्थास्तरावर मार्गदर्शक तत्वे निर्धारित करण्यात यावी.
- आपल्या महाविद्यालयातील माजी विद्यार्थी व अध्यापक यांचेशी विद्यार्थ्यांचा सुसंवाद प्रस्तावित करण्यासाठी व त्याचा शैक्षणिक लाभ घेण्यासाठी मेंटर (Mentor) पध्दत संस्थास्तरावर राबविण्यात यावी.
- आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच शिक्षकांना रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट क्षेत्राचे महत्व पटवून देऊन सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे.

( डॉ. एस. के. महाजन )
प्र. संचालक तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,
मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई ३२.

---

जा क्र तंशिविकापु/विवि/२०१०/ ८७५८

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दिनांक : १७/०९/२०१०
18 SEP 2010

प्रत : प्राचार्य, या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व तंत्रनिकेतन / अभियांत्रिकी महाविद्यालेय / औषधनिर्माणाशास्त्र महाविद्यालये व तत्सम संस्था.

आपणास कळविण्यात येते की उपरोक्त पत्रामध्ये दिलेल्या निर्देशानुसार आवश्यकत्या सर्व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात व त्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डी एन शिंगाडे)
प्र सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे